१९७६)  इवलेसे रोप लावियले द्वारी । तयाचा वेलू गेला गगनावरी ॥  (२००८



# ज्योती

***************************************************************************************

**ईशान्य ओहायो मराठी मंडळ** **neomm.org** **NEOMM Tax ID: 34-1644989**

**April – July 2008**

***************************************************************************************

## कार्यकारिणी २००८

**अध्यक्ष: सुनंदा कुलकर्णी**
president@neomm.org
**उपाध्यक्ष: नितीन गोखले**
**सचिव: ज्योती हरवाळकर**
secretary@neomm.org
**कोषाध्यक्षा: स्मिता सामंत**
treasurer@neomm.org

**सांस्कृतिक कार्यवाह: शैला मुडे**
**'ज्योती'– संपादक:** रजनी शेंदुरे
editor@neomm.org
**'ज्योती' मुद्रक–वितरक:** विजय हरवाळकर,
**वेब मास्टर:** चैताली नाडकर्णी,
**सहाय्य:** महावीर शेट्टी, सरोजिनी शेट्टी
**विश्वस्त**–मेधा गोडबोले, शोभा तामसकर, कृष्णा देशपांडे

*************************

### ज्योतीसाठी साहित्य

गावातील साहित्यिक मंडळींकडून *ज्योती* मध्ये साहित्याची आवश्यकता आहे. आपले लेख, कथा, कविता, ईनोद; दर सम महिन्याच्या (फेब्रु., एप्रिल, जून इत्यादि) १५ तारखे पर्यंत इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठवावे. मराठी टायपिंगची सोय हस्तलिखित पानी $१० दराने उपलब्ध आहे.

*******************

### Advertisement Rates

per bimonthly issue

| | |
|---|---|
| Qrtr Page: | $25 |
| Half Page: | $50 |
| Full Page: | $75 |

**All rates for the Diwali issue are double.**

## संपादकीय---

**नमस्कार मंडळी!**

मराठी वर्षातला अखेरचा सण होळी. फ़ाल्गुनातल्या पौर्णिमेचा हा दिवस. सरत्या थंडीला निरोप द्यायचा. जुनाट, कालबाह्य, वाईट आचार विचारांची मनातल्या मनात होळी पेटवायची. वसंताच्या स्वागताला सज्ज व्हायच. हा सण मराठी मंडळाने यंदा मोठ्या धामधुमीत साजरा केला. होलीदहन झाल्यानंतर पुरणपोळीच्या बेतावर मंडळींनी मस्त ताव मारला. जोगळेकर आणि साथिदारांनी तबला डग्ग्याच्या तालावर मराठी लोकगीतांची धमाल मेफल जमवली.

मग एप्रिल महिना संपत आला तेव्हा कुठे वसंत ऋतुचे पाय क्लीव्हलंडला लागले.  या वर्षी वसंताचे स्वागत करायला मनोरंजनाचा गजरा घेऊन सुधीर गाडगीळ, स्मिता तळवलकर आपल्या कलाकारांचा संच घेऊन आले होते. त्या मंडळींनी गप्पाट्प्पांपासुन ते गाण्याबजावण्यापर्यंत नानाविध कार्यक्रमांची सुंदर गुंफण सादर केली.

या दोनहि कार्यक्रमांना खूप छान प्रतिसाद मिळाला. आता उन्हाळ्याच्या मध्यावर बेत आहे वनविहाराचा. ब्रेक्सव्हिलच्या जवळ पसरलेल्या हिरव्या वनात एक दुपार – खेळ, खाणेपिणे, गप्पागोष्टी यात घालवायची कल्पना मस्त आहे. तेव्हा मंडळी, नक्की यायच पिकनिकला.

– रजनी शेंदुरे

****************************************

### Upcoming Events

| | |
|---|---|
| **जुलै २६:** | **पिकनिक** |
| **सप्टेंबर ६:** | **गणपती** |
| **नोव्हेम्बर १:** | **दिवाळी** |

**Please spread the word about these events and help make them a huge success.**

-

## आगामी कार्यक्रम

### *Picnic*

**On Saturday, July 26th**
**Time: 11 AM**
OTTAWA POINT RESERVED PICNIC AREA. in Breaksville..it has a shelter/privacy and big play ground.

**RSVP:** Please e-mail secretary@neomm.org
**Call:**Jyoti: (216) 692-9773
OR Sunanda: (440) 829-1966
OR Smita: (440) 725-1503

By Noon on July 23rd and let us know how many from your family will attend the Picnic.

### *देवकी पंडीत*

**यांचे सुश्राव्य गायन ऐकण्याची सुवर्णसंधी दवडु नका.**
**हा शास्त्रीय व सुगम संगीताचा कार्यक्रम ३० मे रोजी सायंकाळी ७:३० वाजता आहे.**
**स्थळ: Shendure Residence**
**17460 Deepview Drive**
**Chagrin Falls, Ohio.**
**Tel: (440) 423-5413**

**For more info: call Ravi Gaonkar or Rajanee Shendure**

**नमस्कार,**

मन शुध्द तुझ गोष्ट आहे पृथवी मोलाची
तू चाल पुढ तुला र गड्या भीती कशाची पर्वा भी कुनाची
झेंडा भल्या कामाचा जो घेऊनी निघाला
आन वाटे मधी काट कुट बोचती त्येला
रगत निगल तरीबी हसल शाबास त्येची

हे गाणे माझे वडील मी लहान असताना नेहमी म्हणायचे, आणि ते माझ्या ह्रदयावर कायमचे कोरले गेले आहे.
या वर्षी अध्यक्षपदाची जबाबदारी घेतल्यावर तर याची प्रचीतीच आली.

या प्रचंड विश्वात मी कोण? माझे येथे काय काम आहे? या आणि अशाच प्रश्नांचे उत्तर मी सतत शोधत असते. काल मी कोणाची मुलगी होते, आज कुणाची आई, तर उद्या आजी. मग मी कोण? माहीत नाही.

आयुष्याकडून अपेक्षा कधीच केल्या नव्हत्या. जसे आले तसे भोगले. नाही तरी तेच खरे. आपण कोण ठरवणार? कर्ता करविता दुसराच कुणी!

आपण फक्त कारण मात्र होतो. बैलगाडी खाली चाललेल्या कुत्राला वाटते की मी चाललोय म्हनून गाडी चालतेय. बैलाला वाटते तोच चालवतोय, आणी माणसाला वाटते तो चालवतो. छे!! काही समजत नाही. असो...

कर्मण्येवाधिकारस्ते या उक्ती प्रमाणे आपण आपले काम बिनबोभाट करावे येवढे खरे!!......कसल्याही फलाची अपेक्षा न करता....

तर...सध्याची अध्यक्षपदाची जबाबदारी अशा वृत्तीने पूर्ण करता आली तर मिळवली.

मंडळातली प्रत्येक व्यक्ती मला माझ्या आप्ता सारखी आहे, आणी सर्वांशी समभावाने वागण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

म्हणून शेवटी ही प्रार्थना . . .

मोरया मोरया मी बाळ तान्हे
तूझीच सेवा करू काय जाणे
अन्याय माझे कोट्यानुकोटी
मोरेश्वरा बा तू घाल पोटी

– सुनंदा


Sunny's

ASIAN

FOOD & SPICES

Monday - Saturday 11am - 8pm
Suday 11am - 7pm

6281 SOM Center Rd.
Solon, Ohio 44139

Phone: 440-248-0801
Fax: 440-248-0166

मागच्या वर्षी नाटक संपल्यावर आम्ही काही लोक एका भारतीय रेस्टॉरंट मध्ये जेवायला गेलो. पालकपनीर, चिकन माखनीबरोबर गप्पा चालू झाल्या. सुट्टीला कुठे जाणार? आमचे होस्ट बोलून गेले की आम्ही सायकल भ्रमणास जाणार आहोत. एकाने मला विचारले तुला सायकल येते का? म्हणजे तुला फार चालवायला नको. नवऱ्यावर सगळा भार, का तिंचाकीवर जाणार? अशी बरीच चर्चा आमच्या सायकल भ्रमणावर झाली. शेवटी मी म्हणाले आता चर्चा पूरे, कृती झाली की तुम्हाला कळवते. त्याचे असे झाले.....

दरवर्षीप्रमाणे जाने– फेब्रु. मध्ये आम्ही प्रवासी कंपन्यांच्या पुस्तीका चाळत होतो आम्हाला आल्प्स दरीतून पहायचे होते, तशी ही ट्रीप दिसली. मी म्हणाले ही ट्रिप छान दिसते. नंतर मी हे सर्व विसरून गेले. मदर्स डे ला दाराशीमोठे पार्सल दिसले. मला वाटले सुरुची ने काही पाठवलेले दिसते. उघडून पाहते तो काय? आंत माझ्या मापाची दुचाकी. मी यांना म्हणाले “अहो मला कशाला सायकल? आपल्याकडे मंजूची २० वर्षाची जुनी आहे की!” “अग पण कार्ड तर वाच, तुला यावर्षी ऑस्ट्रीयात सायकलच्या प्रवासास नेणार आहोत. तुला चालायचा कंटाळा आहे ना?” झाले मग आमचा सराव सुरु झाला. पहिल्याच दिवशी ड्राइव्ह वे मध्ये साष्टांग नमस्कार! जेव्हां मुलींना ते सांगीतले तेव्हां त्या म्हणाल्या की आई तू शाळा कॉलेजात सायकल चालवत होतीस हे खोटे सांगतेस. म्हणे डबल सीट सुद्धा जायचीस! असो पहिल्यांदा तर गिअर देखील बदलता येइना. मग मात्र मी रोज सकाळी एक मैल व संध्याकाळी एक मैल असे रुटीन चालू केले. मैलांचे हे अंतर वाढवत शेवटी दहा मैल सकाळी व आठ मैल संध्याकाळी असा शिरस्ता सुरु केला. बापू तर दुपारी पण चालवत असत. जाण्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी लांबलचक फेरी मारली.

फ्रँकफुर्ट मार्गे आम्ही साल्स्बुर्ग विमानतळावर पोचलो. आमच्यासारखेच आठ जण विमानात होते. एका व्हॅन मधून आमच्या शॅलेसारख्या हॉटेल वर आलो. बाहेर खिडकीतून फुलेच फुले दिसत होती. अंघोळ करून मस्त झोप काढली. विमानात बसून पाय अगदी आंबून गेले होते. संध्याकाळी पाय मोकळे करून आलो. शेजारी नदी होती त्यापलीकडे जर्मनी! युरोपीअन युनियन मुळे बॉर्डर ओलांडायला चौकी वगैरे काही नाही.

रात्री सर्वांच्या ओळखी होण्यासाठी कॉकटेल पार्टी होती. आम्ही १७ सायकल स्वार होतो. ३ लीडर्स होते. ( फ्रेंच, कॅनेडिअन व २२ वर्षाचा ऑस्ट्रियन मुलगा. ) आम्ही ५ जोडपी होतो तर इतर मैत्रिणी होत्या. त्यात वकील, रिसर्चर, शाळा मास्तरीण, लायब्ररीयन, फायनानशीयल कन्सलटंट असे सर्वच होते. आणि हो कॉम्प्युटर ॲनलीस्ट शिवाय ग्रूप पूर्ण होणारच नाही. आम्ही दोघे सगळ्यांत ज्येष्ठ म्हणजे ७०+ होतो.

सकाळी अगदी अधाशासारखी न्याहरी खाल्ली. बसमधून दुसऱ्या डोंगरातील एका हॉटेल मध्ये जायचे होते. आजुबाजूची वनश्री बघत आमचे आह! ओह! चालले होते. असे आम्ही झेलम सी गावात पोचलो. हॉटेलच्या मागच्या आवारात आमच्या सायकली होत्या. प्रत्येकाने आपापल्या सायकलचा कब्जा घेतला. मग गाईडने प्रत्येकाला सायकलचा ब्रेक, गिअर बदलणे हे सर्व समजावले व सीट्स ठीकठाक करून दिल्या. २ मैलांवरील डोंगरपायथ्याशी राईड घेतली व तेथेच सायकली लॉक केल्या. ते पण एक तंत्रच होते. मग आम्ही समोरच्या धबधब्याच्या काठाने वर चढत गेलो. मी ५०० पायऱ्या व बापू १५० पायऱ्य चढले. थंडी खूप वाजत होती. संध्याकाळी जेवण झाल्यावर मीटींग झाली त्यावेळी आम्हाला १० ऑस्ट्रीयन शब्द शिकवले. दूसऱ्या दिवसाचा सविस्तर कार्यक्रम दिला. त्यात अनेक खाणाखुणा होत्या त्यामुळे चुकलात तर लगेच कळण्यास मदत व्हावी. अर्थात आमच्या पुढे व मागे गाईड असायचाच.

सकाळी सायकलला लिंबाचा रस घातलेली पाण्याची बाटली असे. बॅगेत फोन, नकाशा, डोक्याची टोपी असे सर्व असे. रोज २०–२५ मैलाचा पल्ला असे. रोज वेगळा मार्ग असायचा; कधी शेतातील २ बांधांमधून तर कधी हमरस्त्यावरून; तर कधी नदीच्या काठांवरून. सायकलचे रस्ते अगदी स्वच्छ आहेत. आणि हमरस्त्यावर सायकली दिसल्या की मोटारी थांबत. दूपारचे जेवण निरनिराळ्या सिनिक ठिकाणीं असायचे. स. १० च्या सुमारास सपोर्ट व्हॅन भेटत असे त्यात फळांचा रस, चॉकलेट्स कुकीज आमच्याठी असत. कधी शेतात बसून तर कधी चर्चमध्ये तर कधी सीमेटरीच्या आकर्षक बागेत. एक दिवस ३०० वर्षे जुन्या फार्महाउसवर लंचचा स्टॉप होता. त्या बाईने आपल्या वैलचुलीसारख्या शेगडीवर गरम जेवण केले. प्रत्येक वस्तु घरगुती वा तिच्या फार्मवरील! जसे फळांचे रस, चीझ. तिचे घर युरोपीअन गॉर्मे मासिकात दाखवले होते. तिच्या बेड व ब्रेकफास्ट खोल्यांत रहाण्याची सोय सुद्धा आहे.

एक दिवस आम्ही ट्रेनने डोंगरावरील किल्ल्यावर गेलो. तेथे फाल्कन शो व किल्ला पाहिला. आमच्या सायकली व्हॅनने तेथे आणल्या होत्या. उतरताना आम्ही सायकलींवरून खाली आलो. मजा आली. जंगलातून गेलो त्यावेळी एकही रेडरायडींगचा कोल्हासुद्धा दिसला नाही. एक दिवस आम्ही सायकलन दूरवर गेलो व येताना ट्रेनने आलो. ट्रेनमध्ये अगदी सहज सायकली चढवता येतात. एक दिवस सायकलवरून स्की–स्लोपच्या पाथ्याशी गेलो व्हॅन आमच्या सायकली घेऊन गेली. व आम्ही लिफ्टने डोंगरावर गेलो. सुंदर सिनरी होती. हिरवीगार शेते व टुमदार घरे. काहींनी स्की–डायविंग केले. रोज संध्याकाळचे जेवण तेथील प्रसिद्ध रेस्टॉरंट मध्ये असायचे. ऑस्ट्रेयन स्टुडर( ॲपल केक ) प्रसिद्ध आहे. पण आम्हाला उत्तम स्टुडर काही मिळाले नाही. एके दिवशी साल्सबुर्गच्या चौकात म्युसिक ऐकले. ‘साउंड ऑफ म्युझिक’ जगप्रसिद्ध सिनेमा याच भागात केला आहे. एकदा त्यातील ठिकाणे बघत आम्ही सायकल चलवली, अंगावर रोमांच आले आणि उगीचच रोमांटिक वाटू लागले. रात्री साउंड ऑफ म्युझिक वर आधारीत गाण्याचा कार्यक्रम पाहिला.

अशी ही सुंदर ट्रिप लवकर संपल्याचे खूप वाईट वाटले. आमच्या रहाण्याच्या जागी पोहण्याचा पूल स्टीम–बाथ अशी सर्व

सोय असे. रोजच्या सायकल भ्रमणानंतर मस्त स्विमिंग वा बाथ घेऊन आम्ही जेवणासाठी जात असू.

आमच्यातील एक हौशी जोडपे त्यांच्या लग्नाचा ४० व वाढदिवस साजरा करायला व्हिएन्नाला ४ दिवस सायकलींग साठी गेले तर दूसरे एक जोडपे ग्रीक बेटावर सायकल व फटफटी चालवायला १ आठवडा गेले. आम्ही २ आठवडे ऑस्ट्रीया व स्विट्झर्लंड बघायला गेलो.

बापूंच्या मनात पुढची ट्रिप बार्ज व बाईकींगची करायची आहे पण मी मात्र आमचे वय व ही अवघड ट्रिप यांची सांगड कशी घालायची या विचारात आहे.......

**– मीनाताई गोखले**

====================================

## ज्योती शब्दकोडे क्रमांक १

उत्तर रजनी शेंदुरे यांना १५ जुलै पर्यंत पाठवावे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | | | 8 | | |
| | | | | 9 | |
| 10 | 11 | | | 12 | 13 |
| 14 | | | | 16 | |
| 15 | | | | | |

**आडवे शब्द:**

१. जुने नाही ते (३)

४. पाण्याचा मोठा पाट (३)

७. सुर्य ____ भर वर आल्यावर ऊजाडते (३)

८. शहरात शिरताना मालवाहु ट्रकला भरावी लागते

९. जुन्या धान्यांना किंवा पीकांना लागते व त्रासदायक ठरते

१०. जुन्या काळी लिहायचे पेन / दोन रोपांची मुद्दाम केलेली मिळवणी

१२. ऊष्ण धग

१४. माणसाला रहावयाची __

१५. जाण्याची क्रिया (३)

१६. देवाचे उपकार

**उभे शब्द:**

१. होकार नाही (३)

२. दहाच्या दुप्पट

३. नर राक्षस

४. काम

५. फर्निचर, पाने यावरचा चकचकीतपणा (३)

६. शेळी जाते जिवानिशी खाणारा म्हणतो __(३)

१०.भांडखोर (सहसा स्त्रीलाच हे विशेषण का बरे?)

११. घोड्यांना आवरण्यासाठी वापरतात तो

१२. माणसे, प्राणी यांची बाह्य रेषा

१३. रोटी

**उत्तरायण –**

हमरस्त्यावर सायकल, कार, बस, ट्रक असली वाहनेंच केवळ नाही तर बैल, घोडे व उंटही जुंपलेल्या गाड्या, व शिवाय पायदळ अशा आधुनिक वाहनांसमवेत चतुरंग सेनेला सामोरं जायचं असेल तर चलो दिल्ली. मागील अंकावरून पुढे चालू –

कोकणच्या प्रवसानंतर पुणे–मुंबईचा नेहमीप्रमाणें नातेवाईकांचा सहवास, अगत्य, खाणं–पिणं आठवडाभर भोगलं. पिणं मात्र यावेळेला बरंच कमी झालं. यापुढचा प्रवास होता दिल्ली–अहमदाबादचा – दिल्ली–आग्रा बघायला, व त्यानंतर भावी सुनेच्या भावी माहेरी भेटायला. भावी माहेर म्हणायचं कारण म्हणजे जे घर तिच्या वडिलांचं आहे, आणि घरी आजी आहे, ते आज तिचं असलेलं घर उद्यां तिचं माहेर होणार. म्हणजे स्वतःचं घर–संसार नवऱ्याबरोबर थाटल्यावर हा सूक्ष्मपणें होणारा दुरावा येणार, तरी ओढ जात नसते. असो.

मुंबईच्या देशी विमानतळाचा थाट एखाद्या मोठ्या बस–टर्मिनलसारखा होता. तशाच रांगा, माहितीची वानवा, रांगा बदलत कसेबसे आपापल्या विमानांपर्यंत पोहोचलो – आम्ही दोघे व आमची दोघे दिल्लीच्या, आणि भावी सूनबाई अहमदाबादच्या. तिकीट स्वस्तात मिळालं होतं, त्यानुसार पाण्यावाचून काही फुकट मिळणार नव्हतं. चांगली न्याहारी करूनच निघालो असल्यामुळे गरजही नव्हती, पण तरीही फुकट मिळालं असतं तर मात्र घेतलं असतं की नाही ?

विमानाचा प्रवास अवर्णनीय होता, म्हणजे विस्मरणीय होता. दिल्लीला मित्राच्या घरी राहणार होतो. त्याचा ड्रायव्हर आला होता. सकाळची वेळ. थंडीची लाट नुकतीच ओसरलेली. आदल्या दिवशी बऱ्याच फ्लाईट्स् धुक्यामुळे बारगळल्या होत्या म्हणे. आज मात्र सर्व अगदी मनाजोगतं होतं. विमानांत बसून दिवसात काय काय बघायचं याचा आराखडा करून ठेवला होता. लाल किल्ला, कुतुबमिनार, चांदनी चौक. पार्लमेंट, इंडिया गेट, ताजमहाल, फत्तेपूर शिक्री, माहितीच्या नावांची यादी तयार होती. ड्रायव्हरच गाईड होता.

पहिला टप्पा कुतुबमिनारचा. सात स्तरांचा प्लान असून पाच रचलेला हा मिनार बघण्यासारखा आहेच. शिल्प, सिमेट्री, वगैरे. वर्णन करण्याइतकं कळत नाही, पण बघायला आवडलं. पण त्या जागीचा जो गाईड होता त्यानें आणखीही महत्वाचा इतिहास सांगितला.

मंदिरांचा विध्वंस करून त्याच जागेवर मशीद बांधण्याच्या मुसलमानी इतिहासाचा – अट्टाहासाचा – आणखी एक नमुना मुलांच्या लक्षांत आला. कोकणातल्या मंदिरांच्या इतिहासाची आठवण अजून ताजी होती. मंदिराचे आवशेष पूर्णपणे नष्ट करतां येइना, म्हणून त्यांच्यावर चुन्याचे प्लास्टर लेपून झांकले होते. इंग्लिश संशोधकांनी ते प्लास्टर फोडून त्यामागे झांकलेले मंदिराचे स्थापत्य व शिल्प उघड केले. मशिदीचा फक्त चौथराच राहिला आहे. मंदिराचे प्रेक्षणीय शिल्प मात्र एका कोपऱ्यात अजून आहे. असाही मनात विचार आला की भारतीय वंशाच्या इतिहासकारांनी मुसलमानांचं मन दुखवणारं पण सत्य उघडकीस आणणारं असं कृत्य कदापि केलं नसतं. उगाच हिंदूंचं जात्यंधत्व, अंधश्रद्धा उघडकीस यायला नको. आपण इंग्रजांचे उपकार मानावे तेवढे थोडे आहेत.

संध्याकाळी लाल किल्ला बघायचा होता, तिथे सूर्यास्तानंतर छान लाईट शो असतो असं ऐकलं म्हणून. आधी वाटेत दोन एम्पोरियममधे थांबलो–फिरलो. नेहमीच्याच सुंदर व किमती कलाकृति होत्या. मनाला विचार शिवून गेला, की वस्तूंच्या ज्या प्रचंड किमती लावलेल्या असतात, त्याचा किती अंश कारागिरांना मिळतो?

पुढे किल्ल्याजवळच्या चांदनी चौकात फिरलो. फक्त बाजार. बघण्यासारखे कांहीही नाही. पण भूक लागली असल्यानें तिथल्याच मॅक्डॉनल्डमधे गेलो. आवडीप्रमाणे निरनिराळे मॅक् खाल्ले. भविष्यकाळी पुढील पदार्थ केले जातील अशी माझी खात्री आहे – मॅक्नान व मॅक्डोसा, मॅक्ढोकळा, मॅक्मलाई व मॅक्गुल्ला, वगैरे, वगैरे, वगैरे, यादी करावी तेवढी थोडी. कधीकधी उगीच भीती वाटते की भारताचाच मॅकिण्डिया तर होणार नाही ?

रात्री लाल किल्ल्याच्या पटांगणांत लाईट शो बघायला बसलो. थोडक्यात सांगतो, इतका पोरकट शो आजवर पाहिला नव्हता. प्रकाशाचा एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सतत फिरत राहणारा झोत आणि त्याच्या प्रकाशात काहीही बघायला नाही, फक्त पोकळी. मोठ्या आवाजात इतिहास निवेदन, की जे मला एक CD लावून कुठेही निवांतपणें ऐकता आलं असतं. आवडलं ते इतकंच की त्यात १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धाचं व त्यातील वीरांचं वर्णन अनपेक्षितपणे भारतीय मनोभूमिकेचं होतं – बंडाच्या धर्तीचं नव्हतं. मनोमन धन्यवाद दिले.

दुसऱ्या दिवशी सकाळी आग्र्याच्या राजमार्गाला लागलो. चतुरंग देशी व चतुरंग पाश्चात्य अशी अष्टविध सर्व वाहने (पाय हेही वाहन मोजून) या पूर्ण दिवसाच्या परतीच्या प्रवासात भरपूर वाहतुकीच्या रस्त्यावर बघायला मिळणार होती. राजमार्गाच्या वाटेवरच एका हॉटेलात थांबून नाश्ता घेतला. उत्तरप्रदेशात दख्खनी इडली–डोसा झकास होता.

पहिला टप्पा होता मथुरेचा. तिथे श्रीकृष्णाची जन्मभूमी मानलेल्या जागी सुंदर मंदिर आहे. कडेकोट बंदोबस्त आहे, दहशतवाद्यांच्या भीतीने. दहशतवाद्यांनां दहशत नाही याची खंत वाटली. हेही मंदिर तीनदां उद्ध्वस्त केले गेलेले चौथ्यांदा बांधले असून आता छान ठेवले आहे. खूप बरं वाटलं. जन्मस्थानाची जागा तुरुंगाची कोठडी अशीच बांधली आहे. बाहेर मूर्ति वगैरे विकणाऱ्याचं दुकान होतं. दुकानदाराला सहजच विचारलं की विकायला मूर्ति चिन्यांनी बनवलेल्याच आहेत की काय. तर प्रांजळपणे म्हणाला की पूर्वी असत पण गेले कांही वर्षांपासून तरी फक्त भारतीय मालच ठेवतात.

मथुरेचे पेढे प्रसाद म्हणून घेतले. आणि पुढे खूपच पश्चात्ताप झाला, फक्त एक शेरभरच घेण्याचा. पेढे अप्रतिम होते, आणि ते तसे असल्याची ख्याती अहमदाबादला पोहोचल्यावर कळली होती. मला वाटतं मी दिल्लीच्या भागात यदाकदाचित पुन्हा गेलो तर निदान त्या पेढ्यांकरितातरी माखनचोराच्या जन्मस्थानीं पुन्हा जाईन.

आग्र्याच्या जवळ म्हणजे तासाभरावर आलो. तिथे एक फाटा फत्तेपूर शिक्रीला जातो. आम्हांला तिकडे जायची इच्छा होतीच, पण मथुरेला अपेक्षेपेक्षा अधिक वेळ गेला असल्यामुळे प्रश्न पडला. ड्रायव्हर–गाईड म्हणाला जवळच आहे. खात्री करून घ्यायला आणखी एकाला विचारतां म्हणाला १०–१५ किमी आहे. कोकणची आठवण झाली. त्यातून कोकणच्या वरताण रस्त्याचे बांधकाम. पाऊण तास लागला. १५–२० किमी गेल्यावर कळले की आणखी पुढे १५ किमी, व रस्ता चांगला. अगदी हरिहरेश्वराजवळचे उत्तर, आणि तोच अनुभव. शिक्रीला पोहोचायला इतका उशीर झाला की त्याच रस्त्यानें परतून वेळेवर आग्र्याला पोहोचणे अशक्य होते. म्हणून दुरूनच सलाम ठोकून परत फिरलो. ताजमहाल बघायला वेळेवर पोहोचून निवांतपणे बघायला मिळाला.

मुलें ताजमहाल प्रथमच पहात होती. आतून बाहेरून सर्व बाजूंनी पाहून मुले थक्क झाली. अर्थातच लग्नांनंतर बायकांसह पुन्हा येण्याचा निश्चय दोघांनी केला. मला मात्र हाच ताजमहाल २५ वर्षांपूर्वी पाहिलेला आठवत होता. भव्यपणा, बांधणी, कोरीवकाम सर्वदृष्टीनें जगप्रसिद्ध असलेला, शुभ्र संगमरावराचा आणि एकेकाळी चिरतरुण वाटणारा ताजमहाल आतां मला कावीळ झाल्यासारखा दिसत होता. अर्थात ही करामत आपल्या राज्यकर्त्यांची. नेमके हेच होण्याची दाट शक्यता माहीत असतानांही या जगप्रसिद्ध जागेजवळ रिफायनरी बांधण्याची करामत नाही तर काय म्हणायचे ?

सांगायचे राहिले. राजमार्गाचा प्रवासही कंटाळवाणा झाला नाही, कारण एकामागून एक विलक्षण दृश्यं दिसत गेली. उजव्या म्हणजे जलदगतीच्या लेनमधे बैलगाडी निःशंकपणें जाते. बैल माणसाच्या मस्तीनें गाडी ओढतो आणि गाडीवान बैलबुद्धीने गाडी हाकतो. एका ठिकाणी एक ऑटोरिक्शा उजव्या, म्हणजे फास्ट,

लेनमधे उलट दिशेने चालली होती ‘त्यात काय मोठे’ अशा थाटात जणू. गाईडने खुलासा केला की तो कदाचित वळण चुकला असेल आणि आता परत आपल्या योग्य बाजूने जायची सोय होईपर्यंत, कदाचित २-३ मैलसुद्धा असा जात राहणार आणि सर्वजण त्याला सांभाळून घेणार. मुलांना ‘एकमेकां सहाय्य करू’ अशा या केवळ मराठीच नाही, तरा एकंदरीत भारतीय मनोवृत्तीचं कौतुक वाटलं, पण प्रश्नही पडला की अशानें अपघात नाही कां होत ? होतात की. पण जिथे मुळीच धोका वाटत नाही अशा जागी बेधडक चालवण्यानें. इथे तर धोका दिसतो आहे, मग अपघात कसा होणार ? अमेरिकेतपण आपण पाहतो की सर्वाधिक जीवघेणे अपघात चांगल्या हवेच्या दिवसात होतात.

संध्याकाळी आग्र्याहून परतीच्या वाटेवर दुर्मिळ अनुभव घेतला. आमच्या ड्रायव्हरनं आम्हांला जणु थ्रिल राईड द्यायचं ठरवलं होतं. गाडीची गति ताशी ३० ते १२० किमी सतत वरखाली होत होती. मी त्याला सुचवून पाहिलं की आपल्याला तशी घाई नाही. पण तो पेटला होता जणू आपलं कौशल्य दाखवायला. मुलांसह आम्ही अगदी जीव मुठीत धरून बसलो होतो. तसा मी धीरानं बसू शकतो. पण त्या दिवशी मात्र श्रीकृष्णाला हांक मारून प्रार्थना केली की जरी चाक या ड्रायव्हरच्या हातात असलं तरी सारथ्य श्रीकृष्णानं कराव, नाहीतर या जन्मी पुन्हा गीतापाठाची संधी मिळणें अशक्य. जायच्या वाटेवर मथुरेला माथा टेकून पुढे गेल्यानें बहुतेक श्रीकृष्णाला कीव आली असावी. सुखरूप दिल्लीला पोहोचलो.

तिसऱ्या दिवशी फ्लाईट संध्याकाळची असल्यानें दिवसभर वेळ होता. सकाळी तिथले सुप्रसिद्ध स्वामीनारायण मंदिर पाहिलं. अतिशय भव्य मंदिर, खूप मोठा परिसर. मंदिर व आवार प्रेक्षणीय आहेतच. पण मनात घर करून गेले ते सांस्कृतिक उद्यान. भारताची ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा उज्ज्वल करून गेलेल्या महापुरुषांचे व महान स्त्रियांचे पुतळे, व त्यासोबत फलकावर त्यांच्या योगदानाचे वर्णन आहे. खूपच आवडलं. मुलांनां विशेषतः माहितीसह प्रदर्शन फारच आवडलं.

त्यानंतर ब’हाई मंदिराला भेट दिली. सुंदर परिसर, व मंदिराचे स्थापत्य. पण त्यात जीव वाटला नाही, मला तरी. शेवटचा टप्पा होता पालिका बझारचा. मुलांच्या कपाळाला आठ्या, व मलाही उत्साह होता अशातला भाग नाही. पण त्या भुयारातल्या बाजारातील हुज्जत घालण्याच्या प्रकाराची मुलांनां तर गंमतच वाटली. इतकेच नव्हे तर ज्या एका झब्ब्याच्या किंमतीत चार मिळू शकतात ते कसे मिळवायचे हे, अर्थातच आईच्या मार्गदर्शनाखाली, शिकल्यावर त्यांनां जणू दिल्ली जिंकल्याचा आनंद झाला.

वर म्हटल्याप्रमाणें मुलांनीं ताजमहाल बघायला सपत्निक पुन्हा येण्याचा, मी पेढ्यांसाठी मथुरेला पुन्हा येण्याचा आणि बायकोने आमच्याबरोबर नीट शॉपिंग करता न आल्याने त्यासाठी तरी पुन्हा येण्याचा निश्चय करून विमानतळाच्या वाटेला लागलो.

– कौस्तुभ लेले

========================================




Hindustani Vocal Concert

# Sandesh

A message of love, longing & belonging..



*featuring* **Smt Devaki Pandit**

Accompanied by
Kedar Pandit (Tabla) & Kumar Karandikar (Harmonium)

**Presented By**
**Die-Hard Music Lovers in the Cleveland Area**

Date - May 30 2008   Time - 7:30 pm
Venue - Shendure's Residence
17460 Deepview Dr.
Chagrin Falls, OH 44023

No "Tickets", but Donations will be certainly accepted to be able to offer more programs like this in the future.

For more information Contact :

Rajani & Ashok Shendure : Ph - 440 543 4213  Email : rajshendure@yahoo.com
Ravi and Sadhana Gaonkar : Ph - 440-838-6414 Email : ravi_gaonkar@yahoo.com

We will also present Pt. Shaunak Abhisheki during June 2008. Details will follow.

**Come & enjoy our New Indian Vegetarian Buffet Dinner every night**

# Saffron PATCH

AUTHENTIC INDIAN CUISINE

Home of Fresh, Authentic Indian Cuisine
Come, visit us & experience
a unique and mystic evening..
While our chef prepares sizzling meat platters
and bakes bread instantly.

*This hidden jewel is located in the Tower East Building.*

20600 CHAGRIN BLVD.
SHAKER HEIGHTS, OHIO
Tel: 216-295-0400

**B D S**

Financial Service Corporation

*Registered Investment Advisor*

**30405 Solon Road, Suite 16**
**Solon, OH 44139-3415**

Are your investments focused on your future … or just on today's headlines?

We can help you to

Prepare a roadmap for your future & to stay the course!

**Our services include:**

Retirement Planning    Investment Planning    Savings for College    Tax Planning

Visit our website www.bdsfsc.com to learn more about us.

To get a second opinion,

call us at 440-248-5625 Or e-mail to BDS@BDSFSC.com

***Ashok Shendure**, MS, MBA, CFP®, CEBS*    ***Rajanee Shendure**, MBA, CFP®*

Securities and investment advisory services offered through FSC Securities Corporation, Member FINRA/SIPC and a registered investment adviser. Additional investment advisory services offered through BDS Financial Service Corporation, a registered investment adviser not affiliated with FSC Securities Corporation.

PLANNING Pays Off!℠


**If not delievered, please return to**

Rajanee Shendure
17460 Deepview Dr.
Chagrin Falls, OH 44023.